**DR.BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY,**
**CHHATRAPATI SAMBHAJINAGAR -431 004**
**Maharashtra (India)**
NAAC – Accredited "A"
**Tele. :**
Office PBX: (0240) 2403399/400
B.Sc. :- (0240) 2403181
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE :www.bamu.net
:http://bamua.digitaluniversity.ac.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर-४३१ ००४**
**महाराष्ट्र (भारत)**
**नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त**

**संदर्भ क्र. बी. एस्सी./परीक्षा/प्रात्याक्षिक परीक्षा/२०२३-२४/ 1161** **दि.१९/०९/२०२४** 20

## "प्रात्याक्षिक परीक्षेचे वेळापत्रक"
## (पॅटर्न – २०१३)

प्रति,
प्राचार्य,
सर्व सलंग्नीत महाविद्यालये, **(विज्ञान शाखा)**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय :** ऑक्टोंबर/नोव्हेंबर- २०२४ बी. एस्सी. विज्ञान विद्याशाखेतील प्रथम, द्वितीय व तृतिय वर्ष (सत्र पध्दत) सत्राच्या प्रात्याक्षिक परीक्षा पारंपारीक पध्दतीने घेणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ऑक्टोंबर/नोव्हेंबर - २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या बी.एस्सी. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतिय वर्ष (सत्र पध्दत) **B.Sc. II$^{th}$, IV$^{th}$, V$^{th}$ & VI$^{th}$** सत्राच्या विद्यार्थ्यांच्यां प्रात्याक्षिक परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी खालील मार्गदर्शक मुद्याचे पालन करून प्रात्याक्षिक परीक्षा महाविद्यालयात घेण्यात याव्यात.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रात्याक्षिक परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| 01 | **Pattern 2013**<br>**B.Sc. II, IV$^{th}$, V$^{th}$ & VI$^{th}$ Semesters** | **दि. ०१/१०/२०२४ ते दि. ०७/१०/२०२४** |

(टिप :- अभ्यासक्रम (P-2013) नुसार B.Sc. V$^{th}$ Sem. Mathematics MAT-505 व B.Sc. VI$^{th}$ Sem. Mathematics MAT-605 या विषयाकरीता प्रात्याक्षिक परीक्षा लागू करण्यात आलेली आहे.)

**(महत्वाची सुचना : ०१ B.Sc. II$^{th}$, IV$^{th}$, V$^{th}$ & VI$^{th}$ सत्राच्या प्रात्याक्षिक परीक्षेच्या गुणयाद्या बाबत प्रस्तुत पत्रातील अनु. क्र. ०८ व १० प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.**
**०२. उपरोक्त दर्शविलेल्या प्रात्याक्षिक परीक्षेचे बैठक क्रमांक प्रात्याक्षिक परीक्षेचा आरंभ होण्यापुर्वी संबधित महाविद्यालयाकडून बैठक क्रमांक प्राप्त करून घ्यावेत.)**

१) बी.एस्सी. प्रथम वर्ष ते तृतीय वर्ष (सत्र पध्दत) सत्राचे वार्षीक (मार्च/एप्रिल) प्रात्याक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक (External Examiner) अनिवार्य आहे.

२) बहिस्थ परीक्षकांची यादी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३) बहिस्थ परीक्षकांच्या यादीतील परीक्षकांना संपर्क साधुन त्यांना संबधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रात्याक्षीक परीक्षक म्हणुन नियुक्ती पत्र देऊन त्यांच्या उपस्थितीत परीक्षा घेण्यात याव्यात.

४) प्राचार्यांनी ज्या बहिस्थ परीक्षकांना नियुक्त्या दिलेल्या आहे त्यांना दिलेल्या नियुक्तीची प्रत त्याच दिवशी **bscunit@gmail.com** या ईमेलवर पाठवावे.

५) प्रात्याक्षिक परीक्षेचे वेळापत्रक (बॅचेस्) हे विषय Combination नुसार विद्यापीठाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे तयार करावे आणि विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावाव्यात.

६) प्राचार्यांनी जिल्ह्याअंतर्गतच बहिस्थ परीक्षकांना नियुक्त्या नेमणुक द्यावी, सदर यादीतील बहिस्थ परीक्षक जिल्ह्यामध्ये उपलब्ध नसल्यास जवळच्या जिल्ह्यातील परीक्षकांची नेमणुक करण्यात यावी तेही शक्य न झाल्यास आपल्या महाविद्यालयातील तज्ञास परीक्षक म्हणुन नियुक्त करून त्यांच्या मार्फत परीक्षा घेण्यात याव्यात.

७) विज्ञान विद्या शाखेच्या सर्व अभ्यासक्रमासाठी Practical/Dissertation/Oral/Viva-Voce या परीक्षेसाठी विद्यापीठामार्फत पदवी/पदव्युत्तर स्थरावर परीक्षक नेमण्यात येतात. सदरील परीक्षकांचे प्रवास भत्ता व दैनंदिन भत्याचे देयके (TA/DA) सबंधीत महाविद्यालयामार्फत नियमानुसार देण्यात यावेत. हा खर्च महाविद्यालयास परीक्षेसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या अग्रीम रक्कमेतुन करण्यात यावा.

८) सर्व विषयांच्या प्रात्याक्षिक परीक्षेच्या गुण याद्या बंद लिफाफ्यावर परीक्षेचे नाव, बॅचेस, वर्ग, विषयाचे नाव, पेपरचे नाव, केंद्राचे नाव, तसेच परीक्षकांच्या स्वाक्षरीसहीत पुर्ण नाव व महाविद्यालयाचे नाव नमुद करून सत्रानुसार बंद लिफाफ्यात एकत्रित सिल करून प्रस्तुत महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे जमा करून घेण्यात याव्यात, तद्नंतर प्राचार्यांनी त्यांच्या समक्ष बंद लिफाफ्यातील गुणयाद्या खुल्या करून **Data Entry** करीता महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांकडे त्वरीत उपलब्ध करून देण्यात याव्यात.

९) प्राचार्यांनी प्रत्येक विषयाच्या गुण याद्या सोबत उपस्थिती अहवाल व अनुपस्थिती अहवाल परीक्षा संपल्यानंतर त्वरीत सादर करावा.

१०) **बी.एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतिय वर्ष (सत्र पध्दत) प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणयाद्या ADES (Assessment Data Export File) वर Data Entry करून (WWW.bamu.digitaluniversity.ac) या संकेत स्थळावर Result Data निकाल घोषित करण्याकरीता उपलब्ध झाल्याबाबतची खात्री करूनच, तद्नंतर हार्ड कॉपी (Hard Copy) (प्रिंट) संबंधीत परीक्षक/नियामक व प्राचार्य यांचे स्वाक्षरीसह प्रात्याक्षिक परीक्षा संपल्यानंतर ०८ दिवसात परीक्षा विभागातील बी. एस्सी कक्षामध्ये सत्र निहाय स्वतंत्र फाईल मध्ये सादर करून त्याची पोच घ्यावी.**

११) प्राचार्यांनी विद्यापीठाच्या पुर्व परवानगी शिवाय परीक्षार्थीना प्रात्याक्षिक परीक्षेकरीता इतर महाविद्यालयात **Out of Tern** म्हणून पाठवु नये, असे केल्यास त्याची नोंद विद्यापीठ घेणार नाही, या बाबतची वस्तुस्थिती पत्राद्वारे विद्यापीठाला कळविल्यास संबधीत विद्यार्थ्यास परीक्षेला बसु देणेबाबत विचार करण्यात येईल.

१२) निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार जे संलग्नीत महाविद्यालय वेळेच्या आत अनु क्र. १० अन्वये कार्यवाही करणार नाहीत, अशा महाविद्यालयांना दि. १४/१२/२०२१ रोजीच्या परीक्षा मंडळाच्या खालील नमुद केलेल्या ठरावनुसार कार्यवाही करण्यात येईल. अंतर्गत गुणांकन देतांना उद्‌भवलेल्या तांत्रिक अडचणीची शहानिशा करून खात्री पटत असल्यास निकालाच्या दिनांकापासुन पहिले १० दिवस रू २०००/- (रूपये दोन हजार फक्त) नंतरच्या पाच दिवसासाठी रू ३०००/- (रूपये तीन हजार फक्त) दंड आकारून निकाल घोषित करण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही सबबीवर कोणताही बदल करण्यात येणार नाही

टिप : सदरील पत्र विद्यापीठाच्या **WWW.bamu.digitaluniversity.ac.** संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

Bhate

संचालक
परीक्षा व मूल्यमांपन मंडळ

१) या प्रत्राची प्रत- समन्वयक, ई-सुविधा केंद्र यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, महाविद्यालयाशी संपर्क साधुन तत्परतेने परीक्षा फॉर्म जनरेट करणेबाबत योग्य त्या सुचना देण्यात याव्यात व दि. २६/०९/२०२४ पर्यंत संपुर्ण फॉर्म जनरेट होऊन परीक्षा क्रमांक देण्याविषयी कार्यवाही करण्यात यावी.

२) भांडारपाल परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना कळविण्यात येते की, ऑक्टोंबर/नोव्हेंबर - २०२४ च्या प्रात्याक्षिक परीक्षेकरीता सर्व सलंग्नीत महाविद्यालयाचे (विज्ञान शाखा) यांना दिनांक २६/०९/२०२४ च्या आत सर्व संबधित साहित्य इत्यादी पुरविण्यात यावे.

-स्वाक्षरित-
संचालक
परीक्षा व मूल्यमांपन मंडळ